दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आज महानवमीचा उपवास...**

**आजचा रंग जांभळा!**



वर्ष : ०५ | अंक : ४७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०१ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## कळंबमध्ये शेतकऱ्यांचा शासनाविरुद्ध आक्रोश करत रस्ता रोको आंदोलन!



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.३०, धाराशिव :** हातात ओले सोयाबीन आणि हातात चाबूक घेऊन शेतकरी संतप्त झाले. ओला दुष्काळ घोषित करावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्तारोको आंदोलन केले.

मे महिन्यापासून सुरू झालेल्या सततच्या पावसात मागील पंधरा दिवसांत धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे नदीकाठच्या तसेच इतर शेतीचे प्रचंड नुकसान झाले. पिकांचे जवळजवळ १००% टक्के नुकसान झाले असून अनेक ठिकाणी जमीन वाहून गेली आहे. घरांची व गोठ्यांची पडझड झाली आहे. गुरेढोरे दगावली आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे तातडीचे असल्याची मागणी आंदोलनात करण्यात आली.

पुरग्रस्त भागातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या आहेत त्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमून स्थायी उपाययोजना करावी. सरसकट शेतकऱ्यांना निकषाबाहेर जाऊन हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, सर्वांना कर्जमाफी जाहीर करावी आणि कर्जवसुली तातडीने थांबवावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात शेतकरी व शेतमजूर संघर्ष समितीच्या वतीने रस्तारोको करून नायब तहसीलदार गोकुळ भराडिया यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अतुल गायकवाड, सचिन काळे, बाळकृष्ण भवर, दत्ता कवडे, ज्योती सपाटे, रुक्शाना बागवान, सुंदर लोमटे, राहुल चोंदे, ॲड. अशोक चोंदे, मालोजी पाटील, पंडित देशमुख आदी शेतकरी उपस्थित होते.

## शेतकरी बांधवांनी पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनाकडे वळावे
## कांदा धोरण समितीत सुवर्णा जगताप यांचे आवाहन..



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, लासलगाव :** राज्यातील कांद्याच्या बाजारभावात स्थिरता राखणे, शेतकरी-ग्राहक-व्यापाऱ्यांचे हितसंबंध संतुलित ठेवणे आणि निर्यातक्षम कांदा उत्पादन वाढवणे या उद्देशाने राज्य शासनाच्या कांदा धोरण समितीची चौथी बैठक मंगळवार, दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष मा. पाशा पटेल होते.

बैठकीत कांद्याचे उत्पादन, साठवणूक, विक्री व्यवस्थापन, निर्यात धोरण आणि भाव नियंत्रण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती व कांदा धोरण समितीच्या सदस्य सौ. सुवर्णा ज्ञानेश्वर जगताप यांनी शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण सूचना मांडत पांढऱ्या कांद्याच्या लागवडीवर भर देण्याचे आवाहन केले.

त्या म्हणाल्या, राज्यात लाल कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असले तरी निर्यातक्षम व साठवणुकीला टिकणाऱ्या पांढऱ्या कांद्याकडे शेतकऱ्यांनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही पांढऱ्या कांद्याची मागणी झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शाश्वत नफा मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनाचा गांभीर्याने विचार करावा. तसेच, पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी शासनाकडून विशेष मार्गदर्शन व सहाय्ययोजना राबविण्याचा विचार सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून संशोधन व उच्च प्रतीचे बियाणे उपलब्ध करून देण्याचाही प्रस्ताव असल्याचे त्या म्हणाल्या.

या बैठकीस कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कांदा व्यापारी संस्था, शेतकरी प्रतिनिधी तसेच कांदा निर्यातदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कांद्याच्या उत्पादनात वैविध्य आणून राज्याला स्पर्धात्मकता आणि टिकाव मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना आखण्यात आल्या.

## बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

लक्ष्मी काशीनाथ बोस, घर क्र. १२१५/०२, दिवाळे गांव, से.१४ नवी मुंबई यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत एमआरटीपी कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून आठवणी आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

## राज्यात पूरसंकट गडद; मराठवाड्यापाठोपाठ नाशिकमध्येही अतिवृष्टी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नाशिक :** राज्यात अनेक ठिकाणी पावसाचे थैमान सुरूच असल्याने पूरसंकट गडद झाले आहे. रविवारी मराठवाड्यापाठोपाठ नाशिक जिल्ह्यालाही अतिवृष्टीचा तडाखा बसला. राज्यात गेल्या २४ तासांत पावसामुळे झालेल्या घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू, तर आठ जण जखमी झाले. ७२ प्राणी दगावल्याची नोंद राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अहवालात करण्यात आली आहे.

सततच्या पावसामुळे सोलापूर येथील सीना नदीने इशारा पातळी गाठली असून भीमा नदी टाकळी येथे इशारा पातळीच्या वर वाहत आहे. नांदेड जिल्ह्यातही गोदावरी नदीला अधिकचा विसर्ग करण्यात आल्याने सखल भागाल पूरस्थिती निर्माण झाली आहे. या पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता राज्यात एनडीआरएफच्या १८ आणि एसडीआरएफच्या सहा तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. मुंबईसाठी दोन तुकड्या कार्यरत आहेत.

नाशिक शहरासह जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोपडून काढल्याने रविवारी गोदावरी, दारणा, उपनद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. एकाचवेळी अनेक धरणांमधून केलेल्या हजारो क्युसेक्स विसर्गामुळे गोदावरीला चालू हंगामातील सर्वांत मोठा पूर आला. गोदाघाटावरील दुतोंड्या मारुती बुडून रामसेतू पूलदेखील यंदा पहिल्यांदाच पाण्याखाली गेला. परतीच्या या पावसाने जिल्ह्यात तीन जणांचा मृत्यू झाला असून, लहान-मोठी ३२ जनावरे दगावली आहेत. याशिवाय १४७ घरांची पडझड झाली. शेतीचे अतोनात नुकसान झाले.



मराठवाड्यात रविवारीही पावसाचा कहर कायम होता. यामुळे येथील पूरस्थिती बिकट झाली आहे. विभागात १८९ महसूल मंडलांत अतिवृष्टी झाली. जायकवाडी धरणाचे आपत्कालीन दरवाजे उघडल्याने नदीकाठची गावे आणि शेतीला धोका निर्माण झाला आहे. गोदाकाठच्या ५० गावांशी संपर्क तुटला आहे. जवळपास २० लाख हेक्टरवरील पिके पाण्यात आहेत.

### सरसकट पंचनामे...

राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे परिस्थिती गंभीर बनू लागलेली असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

जिल्ह्यातील सर्व यंत्रणा योग्य प्रकारे काम करीत आहे की नाहीत, हे तपासून पाहा. यासाठी प्रत्यक्ष संबंधित ठिकाणांना भेट द्या, असे निर्देश. सरसकट पंचनामे करा. कुठेही नियमावर किंवा कायद्यावर बोट ठेवून लोकांना त्रास होईल, अशी वर्तणूक नको, अशा सूचना

### पालघरमध्ये आज शाळा, कॉलेजांना सुट्टी...

पालघर : पालघर जिल्ह्यात गेले दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. आज, सोमवारीही 'रेड अलर्ट' जाहीर करण्यात आल्याने अतिवृष्टीची शक्यता लक्षात घेऊन पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या, तसेच खासगी शाळा, शासकीय आश्रमशाळा, सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर केली. मात्र शिक्षक व प्रशासनातील कर्मचाऱ्यांनी आपापल्या ठिकाणी कार्यरत राहावे, असे निर्देश त्यांनी दिले आहे.

## चहात गुंगीचं औषध दिलं, अन.. आरोपीच्या बहिणीनेही...
## महाराष्ट्र हादरवणारी घटना !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, बुलडाणा :** शेगाव शहरातून धक्कादायक प्रकरण उघडकीस गुंगीचे औषध पाजून महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोघां विरुद्ध बहिण भाऊ वर गुन्हा दाखल. जिल्ह्यामध्ये पोटच्या पोराने वृद्ध शेतकरी आई बापाचा खून करण्याची घटना त्या पाठोपाठ प्रेमी युगलचे डबल मर्डर त्या पाठोपाठ आता महिला देखील सुरक्षित किती आहे हा प्रश्न विचारला जात आहे.

### नेमकं काय प्रकरण?

बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव शहरातून धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. गुंगीचे औषध पाजून महिलेवर वारंवार अत्याचार केल्याने दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेगाव शहरात एका विवाहित महिलेला गुंगीचे औषध पाजून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना




उघडकीस आली आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपी सचिन ज्ञानेश्वर चोपडे पीडितेला याने आपल्या घरी बोलावून चहात गुंगीचे औषध पाजले. त्यानंतर ती शुद्धीत नसताना तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. इतकेच नव्हे तर आरोपीने फिर्यादीचे नग्न अवस्थेत फोटो व व्हिडिओ काढले व ते व्हायरल करण्याच्या धमक्या देत दीर्घकाळापर्यंत वारंवार अत्याचार केला.

या प्रकरणात आरोपीची बहीण हिला सर्व माहिती असूनही तिने गुन्हा लपवून आरोपीस सहकार्य केल्याचा पीडितेचा आरोप आहे. या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात अप क्र. ५२३/२०२५ भा.दं.वि. कलम ६४(२)(ा), ३५१(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उप निरीक्षक संदीप बारींगे करीत आहेत. या धक्कादायक घटनेमुळे शेगाव शहरात तीव्र संताप व खळबळ उडाली आहे.

### जिल्ह्यात नेमकं चाललंय तरी काय...?

गणेशउत्सव काळापासून काळापासून जिल्ह्यामध्ये तलवारी सापडण्याचे प्रकरण त्या पाठोपाठ वृद्ध आई-वडील शेतकरी दांपत्याचे मुलांनीच केलेला खून तसंच खामगाव शहरातील बायपास हॉटेल जुगनूवर अभियांत्रिकी मध्ये शिकत असलेल्या मुलीचं मर्डर प्रकरण, हॉटेलमध्ये सहज उपलब्ध होत असलेल्या खोल्या ज्यामध्ये खोटे आधार कार्डचा घेतला जात आहे आधार यावरून गृह विभाग पोलीस प्रशासन नेमकं करताय तरी काय हा मोठा प्रश्न सध्या विचारला जात आहे.

## धक्कादायक ! 'ट्वेंटी-ट्वेंटी' बिस्किटात आढळल्या जिवंत अळ्या ! !




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, हिमायतनगर (नांदेड) :** हिमायतनगर शहरात आरोग्याला घातक ठरणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. स्थानिक किराणा दुकानातून खरेदी केलेल्या 'ट्वेंटी-ट्वेंटी' बिस्किटाच्या पुड्यामध्ये जिवंत अळ्या निघाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, या बिस्किटाच्या पुड्यावर नोव्हेंबर २०२५ पर्यंतची एक्सपायरी डेट स्पष्टपणे नमूद असूनही त्यामध्ये अळ्या असल्याचे आढळले आहे.

ही बिस्किटे दैनिक अक्षराज हिमायतनगर प्रतिनिधी रमेश पंडित यांचे चिरंजीव यांनी खाल्ली. बिस्किट खाल्ल्यानंतर काही वेळातच त्यांना उलट्या व तीव्र मळमळ होऊ लागल्याने घरच्यांनी तातडीने वैद्यकीय उपचाराची सोय केली. या प्रकारानंतर घरच्यांनी संशयाने उर्वरित पुडा फोडून पाहिला असता त्यामध्ये जिवंत अळ्या रेंगाळताना दिसल्या. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे..

याबद्दल रीतसर तक्रार तहसीलदार यांच्यामार्फत अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा अन्न व औषध प्रशासन विभाग नांदेड यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून केली.

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अशा निष्काळजीपणाविरुद्ध संताप व्यक्त करण्यात येत आहे. संपादक रमेश पंडित यांनी याप्रकरणी संबंधित कंपनी तसेच स्थानिक एजन्सी चालकाविरुद्ध अन्नसुरक्षा विभागाकडे औपचारिक तक्रार दाखल करून याबद्दल अपेक्षित कार्यवाहीची मागणी केली आहे.

तसेच स्थानिक नागरिकांनीही संताप व्यक्त करत तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून निष्काळजी कंपन्यांना वेळीच धडा शिकवणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.




## वाहून गेलं शिवार सारं...

गणेशोत्सवात पाऊस पहिल्या दिवसापासून गणरायाच्या सोंडेत अडकला, तसा तो आदिशक्तीच्या उत्सवातही पहिल्या माळेपासूनच घटी बसला. जाता जाता त्यानं संपूर्ण राज्यच कवेत घेतलं. नव्हे, अक्षरशः थैमानच घातलं. पूरपाण्याची सवय नसलेल्या मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम भाग आणि उरल्यासुरल्या उत्तर महाराष्ट्रातही त्यानं हाहाकार उडवला.

आठवडाभरात पंधराएक माणसांसाठी तो काळ ठरला. दावणीला बांधलेली जनावरं सोडायलाही उसंत मिळाली नाही. दुभत्या गायी, बैल, कोंबड्यांसह हजारो जनावरं वाहून गेली. काही गोठ्यातच फुगून मेली. झाडं, घरादारांच्या हानीची गणतीच नाही. विहिरी, तळी-तलावसुद्धा एक तर गाळाने भरले किंवा ते फोडून तरी नेले!

राज्यातले ३१ जिल्हे अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडले. अठरा कृषिप्रधान जिल्ह्यांतलं सुमारे ४०-४५ लाख हेक्टरवरील खरिपाचं पीक पावसानं वाहून नेलं. आजच्या घडीला अर्ध्याहून अधिक खरीप उद्ध्वस्त झालाच आहे. काही भागांत नद्या अद्यापही पात्राबाहेर आहेत. 'रेड अॅलर्ट'ही कायम असल्यानं आकडा वाढण्याचाच धोका. सोयाबीन, भुईमूग, कपाशी, तूर, मूग, कांदा, फळावळ असं जे काही पीक शेतात उरलंय, त्याचाही भरवसा उरलेला नाही. सडलेल्या, फुगलेल्या शेंगांतून कदाचित नवरात्रीतच अंकुर फुटतील. बळीराजाला ते जणू वाकुल्या दाखवतील. वेदनांची जखम वाहती करतील. 'खरिपाचं सोडा, पुढचा रब्बी तर चांगला होईला ना?' असं शेती, पीकपाण्याचं न कळणारा कोणीही म्हणू शकेल. परंतु, लाखो एकर शेतातली मातीसुद्धा खरवडून गेली असल्यानं पुढं मशागत तरी कशी करायची? नवी बांधबंदिस्ती करायची म्हणजे मोठा वेळ व पैसा लागणारच!

दुष्काळ ओला असो वा सुका, तो शेतकऱ्याला आयुष्यातून उठवतो. शेतीवर जगणाऱ्या चक्रालाही त्याचे चटके बसतातच. नैसर्गिक आपत्ती प्रत्येक वेळी नवं रूप दाखवत असते. आता तरी धडा घेणार काय, म्हणून सांगून जाते. परंतु, 'पालथ्या घड्यावर पाणी' असंच आपलं वागणं सुरू असतं. ऋतुचक्राला डिवचणं सुरूच असतं. झाडं, नद्या, नाल्यांचे गळे घोटण्याचं कारस्थान मग जिवावर बेततं. काही वेळा हानीचा मोबदला पैशांत मोजला जाऊ शकत नाही. परंतु, त्याशिवायही गत्यंतर नसतं. शासन स्तरावरून सरसकट मदतीची घोषणा झाली खरी; मात्र 'ओला दुष्काळ' नव्हे तर 'त्यासारखं' साह्य करण्याचं जाहीर झालं. ओलं संकट यापेक्षा वेगळं म्हणायचं काय? शेवटी घोषणा म्हणजे लबाडाघरचं आवतण. नियम-निकषांची जंत्रीही हळूच पुढे येईलच!

पावसानं शेती वा शेतातली माती नव्हे, शेतकऱ्याचं जगणंच ओरबाडलं. ज्याच्यावर सर्वाधिक भरवसा होता, त्या सख्यानंच पुन्हा एकवार त्याला नाडलं. पीक नव्हे, कास्तकऱ्याची स्वप्नंच कुजली. त्याला साल- दोन साल मागं नेऊन सोडलं. पूरपाण्यानं जे काही फोडून काढलं, ते उभं करायला बराच वेळ जाईल. संकटात कवी कुसुमाग्रजांच्या 'कणा' कवितेची आठवण होते. 'पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा' असं ते सांगून गेले; पण आता शेतातली गुंतवणूक भलीमोठी असल्याने केवळ 'लढ' म्हणण्याचे वा पोकळ बाता करण्याचे दिवस सरले.

शेतीवर गुजराण करणाऱ्यांना आधीच नागवलं गेलं असल्याने पाठीवर हात ठेवतानाच, दुसऱ्या हातानं मदतही द्यावीच लागेल. मग ती आर्थिक असेल वा अन्नवस्त्राची. मायबाप शासनकर्त्यांना निकषांचे अडसर सैल करावे लागतील. संकटाच्या माऱ्यानं पिचलेल्या मराठवाड्यातल्या शेतकऱ्याची येती दिवाळी शेतशिवारातली सडघाण निस्तरण्यातच खर्ची पडेल. पुढे पुन्हा अवकाळी दबा धरून आहेच. त्यामुळे तुम्हा-आम्हालाही दातृत्वाची पणती तेवावी लागेल. 'फूल ना फुलाची पाकळी'प्रमाणं जुळवाजुळव करावी लागेल.

आपल्या गावासाठी, गावकऱ्यांसाठी जमेल तसं रितं व्हावं लागेल. बांधिलकीचं भान दाखवत दातृत्वाचे पूर निघतील, तेव्हा संकटग्रस्तांच्या वेदनेवर खऱ्या अर्थाने फुंकर घातली जाईल. अन्यथा, अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या शेतीचं सारंच मुसळ केरात जायचं.

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा !!

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०६ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले.



गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले.

लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत.

गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला.

१९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील.

बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान सौंदत्तीची येल्लम्मा देवी..!!

कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यातील 'सौंदत्ती' हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जिथे 'येल्लम्मा देवी'चे स्थान आहे. ही देवी दक्षिण भारतात विशेषतः महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमध्ये मातृदेवी स्वरूपात पुजली जाते. अत्यंत प्राचीन असे हे मंदिर कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेजवळील एक मुख्य तीर्थक्षेत्र असून विविध राज्यातील भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. चला तर या देवस्थानाविषयी अधिक माहिती घेऊया...

**●मंदिराचा इतिहास आणि स्वरूप...**

सौंदत्तीच्या येल्लम्मा माऊलीचे मंदिर हे इ.स.१५१४ च्या सुमारास बांधल्याचे सांगितले जाते. भारतीय मंदिर स्थापत्यकलेचा भाग असलेल्या चालुक्य शैलीतील वास्तुकलेचे उत्तम उदाहरण म्हणजे सौंदत्तीचे येल्लम्मा मंदिर. या मंदिरात 'येल्लम्मा देवी' ही मुख्य देवता आहे. जिला 'रेणुका माता' म्हणूनही ओळखले जाते. ही देवता परशुरामाची आई आणि महाशक्तीचा दिव्य अवतार आहे. या ठिकाणी विविध जाती-धर्माचे भक्त समुदाय मोठ्या श्रद्धेने देवीची उपासना करतात.

**●मंदिराची आख्यायिका...**

पुरातन काळापासून सौंदत्तीची येल्लम्मा म्हणजेच रेणुका मातेच्या या मंदिराशी संबंधित एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, रेणुका ही रेणु राजाची कन्या होती. जिने क्रोधासाठी प्रसिद्ध असलेल्या जमदग्नी ऋषींसोबत विवाह केला. ऋषी जमदग्नी आणि रेणुका यांना पाच पुत्र होते. त्यांपैकी एक म्हणजे परशुराम. रेणुकेला पतीप्रती असलेल्या पवित्रतेमुळे आणि भक्तीमुळे वाळूचे भांडे बनवण्याचे अलौकिक वरदान होते. एकेदिवशी आकर्षित झाली आणि यामुळे तिचे पावित्र्य भंगले. परिणामी रेणुकेला स्वतःची वाळूचे भांडे बनवण्याची शक्ती गमवावी लागली. देवशी रेणुकेला तपोबलाने ऋषी जमदग्नींना घडलेला प्रकार लक्षात आला. संतापाच्या भरात त्यांनी मुलांना मातेचा






- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

शिरच्छेद करण्याचा आदेश दिला. परशुरामांनी वडिलांच्या आज्ञेचे पालन केले आणि स्वतःच्याच आईचा शिरच्छेद केला. इतकेच नव्हे तर वडिलांच्या आज्ञेचे पालन करण्यास नकार देणाऱ्या आपल्या भावांचाही त्यांनी शिरच्छेद केला. परशुरामांना आपल्या हातून घडलेल्या कृत्याचा पश्चाताप होताच त्यांनी पित्याकडे आई आणि भावांचे प्राण परत मागितले. त्याक्षणी पितृआज्ञेचे पालन करणाऱ्या परशुरामांना ऋषी जमदग्नींनी जीवनदानाचा वर दिला. ज्याचा वापर करून परशुरामांनी आपल्या आईला आणि भावांना पुन्हा जिवंत केले. यावेळी परशुरामांनी काळा वर्ण असलेल्या एका मृत स्त्रीचे शीर माता रेणुकेच्या धडाला जोडले. ज्यामुळे रेणुका देवी येल्लम्मा' म्हणून ओळखली जाऊ लागली. अन्य काही आख्यायिकेनुसार, शिरच्छेदानंतर रेणुका मातेचे शीर ज्या ज्या ठिकाणी पडले त्या त्या ठिकाणी रेणुका देवीचे स्थान तयार झाले. त्यापैकी एक म्हणजे सौंदत्ती. दक्षिण भारतात या देवतेला 'संरक्षक देवी' म्हणून पुजले जाते.

**● भक्तांची श्रद्धा...**

सौंदत्तीची येल्लम्मा देवी अनेकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात पूजा केल्याने शारीरिक तसेच मानसिक त्रासातून मुक्ती मिळते. उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि जीवनात यश मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. तसेच येल्लम्मा माऊलीकडे मनोभावे प्रार्थना केल्यास नकारात्मक शक्तींपासून रक्षण होते, असेही म्हटले जाते. या मंदिराशी गोंधळी, जोगतीण आणि देवदासी परंपरा पूर्वीपासून जोडलेली आहे. मात्र, गेल्या काही काळात सशक्त सामाजिक बदलांमुळे या परंपरा लोप पावताना दिसत आहेत.

**उदे ग आई उदे...!!**

# मुंबईवर कोणाचा झेंडा फडकणारं : नेते ठणकावून सांगत आहेत आपलाच महापौर....

### * वाचकांचे मनोगत *

आगामी काळात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक पक्षातर्फे आपल्याच गटाचा मुंबईचा महापौर होण्याचे भाकीत नेतेमंडळीकडून केले जात आहे मुंबई आमची आहे असे ठणकावून सांगितले जात आहे मात्र याचे उत्तर निवडणुकीनंतर मिळणारं आहे आता फक्त मेळावे, रणनीती, पक्षाचा अजेंडा या साऱ्या घडामोडी घडत आहेत लवकरच महाराष्ट्रात महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका होणारं आहेत त्या अनुषंगाने सर्वच आघाड्या, पक्षांतर्फे जोडण्या लावताना दिसून येते आहे सद्या राजकारणाचा पार तमाशा झाला आहे सर्वसामान्य जनतेला आणि मतदारांना निवडणूका नकोशा झाल्या आहेत लोकप्रतिनिधींना आपल्या मूलभूत गरजा, समस्या सोडविण्यासाठी निवडून दिलेले असते पण निवडून गेलेले लोक दुसराच उद्योग करतात राजकरण एके राजकारण पक्ष फोडाफोडी, एका पक्षातून दुसऱ्या पक्षात कोलांट्या उड्या मारणे असल्या प्रकारामुळे राजकारणाची पार दिशा बदलली आहे महागाई, अतिवृष्टी, महापूर, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण यासारख्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी आतापासूनच आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत एकमेकांवर अतिशय निचं पातळीवर जावून गंभीर टिका केली जात आहे यंदाची निवडणूक लक्षवेधी ठरणार आहे अनेक पक्ष, आघाड्यामुळे पालिकेवर आपली सत्ता घेण्यासाठी कसरत करावी लागणारं आहे मुंबई महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकवणारं यावरुन आता चढाओढ सुरु झाली आहे मात्र सत्ताधाऱ्यामध्येही अंतर्गत चढाओढ असल्याने सामना उत्कंठावर्धक होणारं याचे अंदाज बांधले जात आहेत एकंदरीत देशाची आर्थिक राजधानी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेली मुंबई शहराची ख्याती हे लक्षात घेता प्रत्येक राजकारणी मुंबई आपलीच असावी असा विश्वास व्यक्त करत आहेत !

- राजू जाधव,
मांगूर जि.बेळगांव

# पदवी आणि स्पर्धा परीक्षांचे धडे एकाचवेळी मिळणार!

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३०, ठाणे :** महाराष्ट्रातील मराठी सनदी अधिकाऱ्यांची संख्या वाढावी व विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना दर्जेदारपणे मार्गदर्शन मिळावे म्हणून मुंबई विद्यापीठ व ठाणे महापालिकेच्या सीडी देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांच्यात महत्वाचा सामंजस्य करार करण्यात आला.

यामुळे मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासोबतच यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रविंद्र कुलकर्णी आणि ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत हा सामंजस्य करार विद्यापीठाच्या कलिना संकुलामध्ये संपन्न झाला.पदवी अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण घेण्यासाठीचा हा सामंजस्य करार ऐतिहासिक असून यामुळे विद्यार्थी यूपीएससी व एमपीएससी परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकतील, नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे अश्या प्रयोगांना वाव मिळत असल्याची प्रतिक्रिया कुलगुरु प्रा. कुलकर्णी यांनी दिली. स्पर्धा परीक्षांसाठी तयारी जेवढी लवकर सुरू करता येईल, तेवढी फायदेशीर ठरते, असे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले.

## बालिका पूजन..

नवरात्र महोत्सवांत
बालिकापूजन करी
नतमस्तकआदराने
आरती शोभते करी

कन्यारुपे महाशक्ती
मन नमले अहंकारी
बाल्य निर्मल तरल
मन रमले शुभंकारी

भाग्योदय कुटुंबाचा
समोर कन्याकुमारी
साफल्य आयुष्याचे
जगण्या येई खुमारी

नारीशक्तीचा जागर
सत्य उघड स्विकारी
नारी भक्तीचा सागर
रे सत्वकोण नाकारी

कुलदीपिका जन्मली
मा सदैवतव आभारी
सत्व महत्व पुजनाचे
सुपंथ चालता उभारी

मूर्त सुस्वरुपअंबाईचे
सेवा रुजु तवदरबारी
सुखस्थरहावे परोपरी
सजवली छानअंबारी

- हेमंत मुसरीक, पुणे
मो.९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ओल्या दुष्काळासाठी शेतकऱ्यांच्या लेकरांचा रस्ता रोको

## आमदार पवार यांना घातला घेराव; पक्ष विरहित आंदोलनात शासनाचा निषेध

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यात अतिवृष्टीने खरीप तसेच बागायती पिके शेतकऱ्यांच्या हातचे गेले असून तोंडचा घास हिरावल्याने ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या लेकरांनी मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी रस्ता रोको केला असून पक्ष विरहित आंदोलनात शेतकऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदविण्यात आला आहे.

आमदार राजेश पवार यांना घेराव घालून जवाब विचारत धारेवर धरले असून दिवाळीच्या अगोदर सरकारी अनुदान मिळणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या लेकरांचा राग शांत झाला आहे.

मुदखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावर विजय देशमुख बारडकर, माधव पावडे, कृष्णकांत देशमुख, दीपक व्यवहारे, सतीश व्यवहारे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला आहे. या



आंदोलकांच्या वतीने शेतकऱ्यांच्या तीन मागण्या त्वरित पूर्ण करण्याचे निवेदन नायब तहसीलदार मारोती जगताप यांना देण्यात आले आहे.

**ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्या, सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करा, शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव द्या,** या मागण्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या लेकरांच्या मागण्यांचा विचार न केल्यास यापुढे जनआंदोलन छेडण्याचा इशारा त्यावेळी देण्यात आला आहे.

या आंदोलनावेळी शेतकऱ्यांनी आपल्या शिवारातील सडलेले सोयाबीन आणून शासनाचे लक्षवेधण्यासाठी रास्ता रोको केला आहे. यासोबतच सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली आहे. शक्तिपीठ महामार्ग न करता शेतकऱ्यांना मदत केली तर जगाचा पोशिंदा शेतकरी जिवंत राहू शकेल अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली आहे. रस्ता रोको दरम्यान नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार या मार्गाने उमरी कडे जात असताना संतप्त शेतकऱ्यांच्या लेकरांनी त्यांची गाडी अडवून हिराव घालत धारेवर धरले होते.

यानंतर आमदार राजेश पवार यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरघोस मदत केली जाईल असे आश्वासन देऊन आंदोलनातून सुटका करून घेतली. यावेळी विजय देशमुख बारडकर, माधव पावडे, कृष्णकांत देशमुख, दीपक पाटील व्यवहारे, हनुमंतराव राजेगोरे, बालाजी गाडे,विशाल पवार, प्रताप देशमुख बारडकर, भगवानराव पवार निवघेकर, दादाराव पुयड, प्रशांत पाटील, मनोज मनपूर्वे, जनार्दन शिंदे, महेश देशमुख, बालाजी मगरे, बालाजी आबादार, दत्तराव शिपरकर, पांडुरंग पाटील शिंदे, गणपत शिंदे, विश्वांभर पुय्यड यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करा - धनराज राठोड

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.३०, किनवट (नांदेड) :** मागील ३-४ वर्षांपासून मराठवाडा सातत्याने अतिवृष्टीचा सामना करीत आहे. यंदा देखील या अतिवृष्टीचा फटका मराठवाड्याला बसला असून जून ते सप्टेंबर या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विभागातील जवळपास १७ लाख हेक्टरवरील पिके बाधित झाली आहे. मराठवाड्यात मागील आठवडाभरात तर पावसाने कहर केला असून या आठवडाभरात तब्बल १८२ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली. परिणामी ४ लाख ९१ हजार हेक्टरवरील शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले. अनेक ठिकाणी ढगफुटीसारखा पाऊस झाल्याने शेत जमीन खरवडून गेली आहे.

मराठवाड्यात १५, ९७, २३८ हेक्टर जिरायत, ३ हजार ८६१ हेक्टर बागायत, ७ हजार ७१ हेक्टरवरील फळपीके बाधित झाली आहेत. याचबरोबर अनेक नागरी भागात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्य, कपडे, विद्युत उपकरणांचे देखील मोठ्या प्रमाणावर



नुकसान झाले आहे.

मराठवाड्यात खरिपाचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेले असून सोयाबीन, मुग आदी पिके नामशेष झाली आहेत. तर कपाशी, उस, मका, बाजरीची पिके आडवी झाली आहेत. शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये गुडघाभर पाणी साचले असून आहे ती पिके पिवळी पडत आहेत. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले असले तरी अद्यापही अनेक ठिकाणी पंचनामे पूर्ण झालेले नाहीत. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे कधी होणार?, अनेक ठिकाणी पिके वाहून गेल्याने पंचनामे तरी कशाचे करणार? असा प्रश्न शेतकरी वर्गांमधून उपस्थित केला जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पिकांची लागवड केली.

मात्र अतिवृष्टीमुळे शेतीसाठी लावलेला खर्चही वसूल झालेला नाही. पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने मराठवाड्यातील शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीने माजी मंत्री माणिकराव ठाकरे च्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील पाहणी समिती मध्ये प्रदेश सचिव धनराज राठोड हे देखील सहभागी होते.

धनराज राठोड यांनी शासनाने मराठवाड्यात त्वरित ओला दुष्काळ जाहीर करून झालेल्या नुकसानपोटी शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार आर्थिक मदत करून संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

# पदवीधर आणि शिक्षक मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३०, सातारा :** पदवीधर आणि शिक्षक मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु झालेला आहे. ३० सप्टेंबरला अधिसुचना प्रसिद्ध करण्यात येणार असून मतदार नोंदणी प्रथम प्रसिद्धी दिनांक १५ ऑक्टोबर आणि द्वितीय प्रसिद्धी २५ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे, तरी जास्तीत जास्त मतदारांनी आपली मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी भगवान कांबळे ह उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी संतोष पाटील म्हणाले, मतदार नोंदणीची जाहीर सुचना दिनांक ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर रोजी प्रथम पूर्नप्रसिद्धी, २५ ऑक्टोबर रोजी द्वितीय पूर्नप्रसिद्धी करण्यात येणार आहे.

दिनांक ०६ नोव्हेंबर पर्यंत प्रकरणपरत्वे नमूना १८ किंवा १९ द्वारे दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहे. दिनांक २० नोव्हेंबर हस्तलिखीते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई, दिनांक २५ नोव्हेंबर प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी करण्यात येणार आहे. दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दि. २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या दरम्यान आहे. दावे व हरकती निकाली काढण्याचा आणि पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे २५ डिसेंबर ला आहे. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा दि. ३० डिसेंबरला होणार आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदार नोंदणी करता सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी ८, पदनिर्देशित अधिकारी ४६ आणि अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी १४ नियुक्त करण्यात आले आहेत.

तसेच पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदार संघात सातारा जिल्ह्यात यापुर्वी ४४ मतदार केंद्रावर शिक्षक ७७११ मतदार होते. तर पदवीधरसाठी १२३ मतदान केंद्रावर ५९०७१ मतदार संख्या होती. आता नव्याने मतदार नोंदणी केली जाणार आहे. पाठीमागची मतदार नोंदणी ग्राह्य धरली जाणार नाही. दरम्यान, मतदार नोंदणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर अर्ज दिला आहे. दिलेल्या नोंदणी केंद्रावर अर्ज स्वीकारले जाणार आहेत, असेही जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सांगितले.


## तरुणांनी हृदय जपण्यासाठी सकस आहार पद्धती स्वीकारा - डॉ. पंडित

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३०, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आयोजित राष्ट्रीय एकात्मता सप्ताह अंतर्गत दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक हृदय दिनानिमित्त रासेयो विभाग आणि आरोग्य समिती आयोजित तरुणाई आणि शक्तिशाली हृदय यावर खंडाळा येथील ज्येष्ठ वैद्य डॉ.वीणा पंडित यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ.पंडित म्हणाल्या, केवळ जिभेला चव म्हणून आरोग्याला अपाय देणारी आहार पद्धती स्विकारल्यामुळे तरुणाईमध्ये हृदयरोगाचे प्रमाण अलीकडील काळात वाढले आहे. वय ६० वर्षानंतर कराव्या लागणाऱ्या आरोग्य चाचण्या वय वर्ष १८ ते २५ तरुणाई करतेय ही गंभीर चिंतेची बाब आहे. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत आहाराचा आकार बदलला आहे. कमी वेळात अन्न न चावता खाल्ल्याने पचनसंस्थेत बिघाड झाला आहे. तरुणांनी अवेळी झोप, आहारात अनावश्यक अन्न पदार्थ स्वीकारलेत अतिप्रमाणात ब्रेड, पाव, तेलकट, चमचमीत पदार्थ सेवन यापासून अपाय होतो ध्यानात घ्या असा सल्ला दिला. डॉ.पंडित पुढे म्हणाल्या, पाश्चात्य पदार्थ खाण्याला मर्यादा असणे, सकस आहार खाणे, वेळेवर उठणे आणि झोपणे यासोबत दैनंदिन व्यायामातून आयुष्यमान वाढविणे ही उत्तम हृदयास्वास्थ्याची सूत्रे आहेत. नैसर्गिक खतांऐवजी रासायनिक खतांची पिके आपण सेवन करत असल्यामुळे आपले आयुष्यमान कमी होतेय, भविष्यात आजची तरुणाई म्हातारी होईल की नाही अशी भीती व्यक्त करत भाजी भाकरी, तूप, पौष्टिक अशी सकस आहारपद्धती स्वीकारा असा मौलिक सल्ला दिला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.हणमंत जाधव म्हणाले, तरुणांमध्ये गंभीर आजार वाढू नयेत यासाठी नेटका आहार आणि व्यायाम गरजेचा आहे.तरुणाई देशाचा भक्कम आधार आहे. तो निरोगी आणि सशक्त असावाअशी आशा व्यक्त केली. समारंभाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदीप मेंढापुरे यांनी, स्वागत उपप्राचार्य डॉ.प्रतिभा पाटणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अमीर इनामदार यांनी तर आभार प्रा.अक्षय वाघापुरे यांनी मानले. आरोग्य समिती प्रमुख प्रा.सुचिता मोरे आणि सहकाऱ्यांनी समारंभाचे संयोजन केले. महाविद्यालय सर्व विभाग विद्यार्थी आणि प्राध्यापकांची उपस्थिती होती.

## भाऊंचा गरबा महोत्सवासाठी येणार अभिनेत्री प्राजक्ता माळी

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.३० मुल (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात आयोजित 'भाऊंचा गरबा महोत्सवा' साठी सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी यांची प्रमुख उपस्थिती विशेष आकर्षण ठरणार आहे. मुल येथील तालुका क्रीडा संकुलात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. चांगुणाबाई सच्चिदानंद मुनगंटीवार सेवा समिती मुल यांच्या वतीने दिनांक २२ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत होत असलेल्या या महोत्सवाला दररोज मोठ्या प्रमाणता गर्दी होत आहे. याअंतर्गत भव्य समूह गरबा दांडिया स्पर्धा आयोजित केलेली आहे. दि.०१ ऑक्टोबर ला संध्याकाळी ५ ते रात्री १० या कालावधीत नवरात्राच्या कार्यक्रमांना अभिनेत्री प्राजक्ता माळी उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता मुल तालुक्यातील बेंबाळ येथे देवी जागरणाला त्यांची उपस्थिती असेल. त्यानंतर मुल येथील तालुका क्रीडा संकुलात सायंकाळी ८.३० ते रात्री १० या कालावधीत गरबा महोत्सवात उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये कमालीचे उत्साहाचे वातावरण आहे. आकर्षक रोषणाई, उत्कृष्ट सजावट व पारंपरिक तालावर होणारा गरबा, यामुळे संपूर्ण मुल परिसरात उत्साह निर्माण झाला आहे.

# थोडक्यात

## पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून देणे पत्रकार संरक्षण समितीची मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.३०, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी नगर परिषदेने शहरात पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी दिपक मोरे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. कुंडलवाडी शहर हे बिलोली तालुक्यातील मोठे शहर असून शहरात विविध वृत्तमान पत्राच्या पत्रकारांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. पत्रकारांची मोठी संख्या पाहता त्यांना शहरात पत्रकार भवनाची आवश्यकता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध होऊ शकली नाही. यामुळे पत्रकार संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, विविध क्षेत्रातील लोकांकडून शहरात पत्रकार परिषद घेतली जाते. त्यासाठी विश्रामगृह सोडले तर दुसरी जागा पत्रकार परिषद घेण्यासाठी नाही. कधी तेही उपलब्ध होत नाही. तसेच सर्व पत्रकारांना बातमीचे लिखाण करण्यासाठी इतरत्र बसावे लागते. त्यामुळे पत्रकारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून कुंडलवाडी शहराच्या विकासात पत्रकारांचा ही मोठा हातभार आहे. शहरातील नागरिकांच्या व परिसरातील गावकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पत्रकारांची मोठी भूमिका आहे. त्यामुळे कुंडलवाडी शहरात पत्रकारांना पत्रकार भवनाची नितांत गरज आहे. यासाठी नगरपालिकेने शहरात भवनासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. अशा मागणीचे निवेदन पत्रकार संरक्षण समितीचे शहराध्यक्ष दत्ता हमंद, उपाध्यक्ष विजय पोतनकर, सचिव श्रीकांत बोलचेटवार,संघटक विनोद काळेवार यांनी मुख्याधिकारी यांना दिले आहे.

## गुहागर मनसेच्या जि.प.कोंडकारूळ उपतालुकाध्यक्ष पदी विखारे यांची नियुक्ती

**अक्षराज : उदय दणदणे**



**दि.२९, गुहागर (रत्नागिरी) :** गुहागर तालुका मनसेच्या जि.प.कोंडकारूळ उपतालुकाध्यक्ष पदी प्रसाद विखारे तर कोंडकारूळ विभाग अध्यक्षपदी सचिन सैतवडेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या नूतन नियुक्त्या गुहागर मनसेसाठी तसेच जिल्हा परिषद गट कोंडकारूळ विभागात महत्वपूर्ण ठरणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक/अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांवर प्रभावित होत पालशेत येथील प्रसाद विखारे पक्ष स्थापनेपासून गुहागर तालुक्यात मनसे पक्ष संघटनेचे काम करीत आहेत. त्यांच्या कामाची दखल घेत मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या हस्ते नुकतीच प्रसाद विखारे यांची जि.प.कोंडकारूळ तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तर मनसेचे निष्ठावंत कार्यकर्ते पालशेत बारभाई येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन सैतवडेकर कोंडकारूळ विभाग अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी मनसे रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर, गुहागर तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांच्यासह असंख्य मनसे सैनिक उपस्थित होते. कोंडाकारूळ विभागात सचिन सैतवडेकर यांच्या सारख्या पक्षनिष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्याला संधी दिल्याने मनसे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## कन्हैय्या इव्हेंट्सकडून घेण्यात आलेल्या दांडिया महोत्सवाचा जल्लोषमय समारोप

**अक्षराज : शिवाजी औसेकर**



**दि.२९, केज (बीड) :** नवरात्र उत्सवामध्ये नारी शक्तीला खुप विशेष महत्व असते. म्हणून मोठ्या शहरांमध्ये जसे महिलांसाठी दांडीयाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसाच दांडिया महोत्सव केज सारख्या छोट्या शहरात महिलांसाठी घेण्याचे स्वप्न होते. ते या दांडिया महोत्सवाचे आयोजन करून पूर्ण केले व केज शहरातील महिलांना कन्हैय्या इव्हेंटस् च्या माध्यमातून एक मुक्त सांस्कृतिक व्यासपिठ आम्ही उपलब्ध करून देवू शकलो याचा मनस्वी आनंद होत आहे असे कन्हैय्या इव्हेंटस् चे संचालक रोहन वेदपाठक यांनी सांगितले. कन्हैय्या इव्हेंटस् च्या माध्यमातून दिनांक २६, २७, २८ सप्टेंबर २०२५ रोजी उत्सव फंक्शन हॉल, कानडी रोड केज या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवामध्ये केज शहरातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेवून आनंद घेतला. तीन दिवसीय दांडिया महोत्सवात विविध उपक्रम, आकर्षक विद्यूत रोषणाई, दर्जेदार साऊंड सिस्टीम, सेल्फी पॉईंट महिलांसाठी करण्यात आले होते. समारोप प्रसंगी सहभागी सर्व महिलांना सन्माचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला.

## विंचूर ते केदारनाथ मोटारसायकल यात्रा पूर्ण करणाऱ्या अभय पाटील यांचा सन्मान

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.३०, विंचूर (नाशिक) :** लासलगाव उपविभागातील उपकेंद्रातील यंत्रचालक अभय पाटील यांनी विंचूर येथून थेट उत्तराखंडातील केदारनाथ यात्रेला मोटारसायकलवरून प्रवास करण्याचा संकल्प केला होता. दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी या यात्रेला प्रारंभ केला आणि तब्बल ३६०० किलोमीटरचा प्रदीर्घ व आव्हानात्मक प्रवास पार करून दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या ही यात्रा पूर्ण केली. एचएफ डिलक्स मोटारसायकलवरून साध्या पण खडतर साधनांतून पार पडलेला हा प्रवास पाटील यांच्या जिद्दीचे, चिकाटीचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक ठरला आहे. डोंगराळ प्रदेश, कठीण हवामान व रस्त्यावरील अडचणींना सामोरे जात त्यांनी ही यात्रा केली. प्रवासादरम्यान त्यांनी अनेक राज्यांमधून मार्गक्रमण केले आणि विविध ठिकाणचे अनुभव आत्मसात केले. या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक म्हणून विंचूर कक्षामार्फत अभय पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कक्षातील अभियंता किरण काकड, ऑपरेटर बोरसे दादा, नंदू बागल,वैभव दरेकर, मनोज आढांगळे,मयुर गायकवाड, अभिषेक कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. अभय पाटील यांच्या या यशस्वी मोटारसायकल यात्रेने तरुणांना धाडस, साहस आणि चिकाटी यांचे नवे बळ मिळाल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

# मुंबईतील फोर्ट परिसरात भटक्यांना गवसला ब्रिटिश कालीन खजाना





**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३०, मुंबई :** मुंबई ही केवळ आर्थिक राजधानी नसून इतिहासाचा जिवंत ठेवा असलेले शहर आहे. शहराच्या विविध भागात आजही अनेक शतकांपूर्वीच्या तोफा पाहायला मिळतात. या तोफा ब्रिटिश, पोर्तगीज आणि मराठा काळातील लढायांची साक्ष देतात. आज भटक्या या मुंबईमधील तरुणांच्या ग्रुपकडून आयोजित करण्यात आलेल्या मुंबई हेरिटेज वॉकमध्ये या तोफांची माहिति देण्यात आली. मयुर विचारे, अमित जगताप, सुमित जाधव आणि आशु महामुणकर या चार भटक्या तरुणांकडून गेले दोन वर्ष मुंबईमधील ब्रिटिशकालीन तोफांचा अभ्यास केला जातोय. आजचा हेरिटेज वॉक हा नागरिकांना या ऐतिहासिक वारशाबाबत माहिती मिळावी.

यासाठी घेतला गेल्याचे भटक्या टीमकडून सांगण्यात आले.तोफांचा वापर समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना थोपवण्यासाठी केला जातो : फोर्ट परिसर, गेटवे ऑफ इंडिया, दादर आणि परेलसह मुंबईमधील विविध भागात या पोलादी तोफा पाहायला मिळतात. या तोफांचा वापर १६ व्या ते १८ व्या शतकात समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना थोपवण्यासाठी केला जात असे, अशी माहिती मयूर विचारे यानं दिली. समुद्र किनाऱ्यावर किंवा किल्ल्यांच्या तटबंदीजवळ बसवलेल्या या तोफा दूरवरून शत्रूंच्या जहाजांवर तोफगोळा डागू शकत असत. मुंबईतल्या प्रसिद्ध फॅशन स्ट्रीटच्या मागे असलेल्या क्रॉस मैदानावर मातीत अर्धवट गाडल्या गेलेल्या अवस्थेत दोन तोफा आढळल्याचे सुमित जाधवने सांगितले. यातील एक तोफ सुमारे १० फूट लांब आणि ३ ते ४ फूट रुंद आहे.

या तोफा बहुधा लोखंड किंवा कांस्य धातूपासून बनवलेल्या असून त्यावर त्या काळातील शिलालेख किंवा नक्षीकाम दिसून येते. ब्रिटिश सत्तेच्या काळात यातील अनेक तोफा हटवून लंडनला नेल्या गेल्या. तर काही स्थानिक स्तरावरच वितळवण्यात आल्या. मात्र, उरलेल्या तोफांमुळे त्या काळचा वारसा मुंबईच्या उदरात आजही टिकून आहे.

**काही तोफा दुर्लक्षित अवस्थेत :–** हेरिटेज वॉकचे आयोजनाचा उद्देश नागरिकांना मुंबईची जुनी ओळखही दाखवण्याचा आहे. या वॉकदरम्यान तोफांविषयी माहिती देत असताना अमित जगताप हा या तोफांचे किमान इकडून स्थलांतर करून त्यांचे जतन केले जावे आणि या ऐतिहासिक वारशाची माहिती नागरिकांना मिळत राहावी ही अपेक्षा असल्याचे सांगतो. तर मुंबईत असलेल्या या तोफांचे जतन करण्याची जबाबदारी महत्त्वाची असून, अनेक ठिकाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे धातू गंजत असून, काही तोफा दुर्लक्षित अवस्थेत आहेत. योग्य देखभाल आणि संरक्षक आवरण दिल्यास या तोफा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवता येतील, अशी आशा आशु महामुणकर याने बोलून दाखवली.

**हेरिटेज वॉकमध्ये २६ जणांनी सहभाग घेतला :–**

भटक्या या ग्रुपकडून आयोजित या हेरिटेज वॉकमध्ये २६ जणांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये ४ महिलांचा समावेश होता. कल्याण, ठाणे, नेरूळ ते अगदी दिघ्यापासून आलेले हे सर्वजण रविवारच्या सुट्टीवर पाणी सोडून आणि पावसाची तमा न बाळगता आले आहेत हे विशेष, अशी मिश्कील टिप्पणी मयुर विचारे याने केली. तरुण पिढीबाबत नकारात्मक विचार करणाऱ्या लोकांना भटक्या ग्रुपच्या या हेरिटेज वॉकने चोख प्रत्युत्तर दिलं.

# स्थानिक कलावंताचे विविध कार्यक्रम; ९ हजार ९९९ कन्यांचे पूजन व भोजन

## श्री माता महाकाली महोत्सवात स्त्रीशक्तीचा गौरव, कन्यापूजन व लेणसौभाग्याचे उपक्रमाने भक्तिमय वातावरण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** नवरात्रीत कन्येचे स्थान सर्वोच्च मानले जाते. याच परंपरेला उजाळा देत श्री माता महाकाली महोत्सवात कन्यामहत्त्व अधोरेखित करणारा अभूतपूर्व उपक्रम पार पडला. या अंतर्गत तब्बल ९ हजार ९९९ कन्यांचे पूजन व भोजन भक्तिभावाने करण्यात आले. महोत्सवात स्त्रीशक्तीचा गौरव अधोरेखित करणारा लेणसौभाग्याचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या तब्बल २५ हजार महिलांना हिरवा चुडा भरून देत सन्मान करण्यात आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आयोजित श्री माता महाकाली महोत्सवात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत.

हा महोत्सव चंद्रपूरच्या एकतेचा लोकमहोत्सव बनला असून विविध सामाजिक संघटना, मंडळे, समाज या महोत्सवात स्वयंपूर्तीने सहभागी झाले आहेत. विशेष म्हणजे महिलांचा सन्मान करणारे उपक्रम या महोत्सवात राबविले जात आहेत. या अंतर्गत ९ हजार ९९९ मायमाउलींचा सन्मान, नवरात्री दरम्यान जन्मलेल्या कन्यांना चांदीचे नाणे देऊन गौरविण्यात आले. तसेच श्री माता महाकाली महोत्सवात कन्यापूजन आणि भोजनाच्या माध्यमातून महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वती या शक्ती स्वरूपिनींच्या प्रतिरूप मानल्या जाणाऱ्या कन्यांच्या चरणांचे पूजन, आरती व नैवेद्य अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सर्व कन्यांना प्रेमपूर्वक भोजन घालण्यात आले. हा सोहळा उपस्थित भाविकांच्या हृदयात कायमचा कोरला गेला. याच महोत्सवात स्त्रीशक्तीचा गौरव अधोरेखित करणारा सौभाग्यवतींना अखंड सौभाग्याची कामना करण्यासाठी लेणसौभाग्याचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या तब्बल २५ हजाराहून अधिक महिलांना हिरवा चुडा भरून देत मंगलकामना करण्यात आल्या. सौभाग्य, मंगल आणि समृद्धीचे प्रतीक असलेल्या बांगड्या भरून देत श्रीशक्तीचा जागर यावेळी



करण्यात आला. कन्यापूजन व लेणसौभाग्य या दोन पवित्र सोहळ्यांनी महाकाली महोत्सवाला धार्मिक व सांस्कृतिक अधिष्ठान लाभले. स्त्रीशक्तीचा गौरव, भक्तीचा उत्कट भाव आणि समाजातील परंपरेचा सन्मान अशा या दुहेरी आयोजनामुळे महाकाली महोत्सव अधिकच संस्मरणीय ठरला.

**महाकाली महोत्सवात साधना सरगम यांच्या स्वरांनी भक्तांचे मन भारावले**

श्री माता महाकाली महोत्सवाच्या पावन वातावरणात काल संध्याकाळी सुप्रसिद्ध गायीका साधना सरगम यांच्या स्वरमधुर गायकतेने भाविक मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या गाण्यानेभक्तिरसाचा सुरेल दरबारच महोत्सवात रंगून गेला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ पदाधिकारी संदीप देशपांडे, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर आणि आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते महाकाली मातेला महाआरती अर्पण करण्यात आली. आरतीच्या तेजोमय लखलखाटात साधना सरगम यांनी आपल्या गोड, सुरेल आणि आत्मस्पर्शी आवाजात भजन सादर करण्यास प्रारंभ केला. त्यांच्या सुरांच्या गोड लहरींनी मंदिर परिसरातील वातावरण जणू दिव्य तेजाने उजळून निघाले.

# एस नॅपकिन बुके हाऊस तर्फे नवदुर्गा पुरस्काराने सन्मान

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.३०, नवी मुंबई :** कामोठे येथे S नॅपकिन बुके हाऊस तर्फे नवी मुंबई पुरस्कृत मानसी सामाजिक संस्थेच्या सौजन्याने कामोठे परिसरातील १४ शाळांच्या नवरात्री उत्सव दरम्यान मुख्याध्यापिकांना नवदुर्गा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नवदुर्गा पुरस्कार ही केवळ एक आनंदवार्ता नसून आमच्या हृदयाला उर्जा देणारी, अभिमानाची आणि प्रेरणेची घटना आहे असे पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापकांनी उद्गार काढले. मुख्याध्यापिकांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ. त्या केवळ शिक्षिका नाहीत, तर ज्ञानाची वाट दाखवणाऱ्या, स्वप्नांना पंख देणाऱ्या आणि संघर्षाला प्रेरणा देणाऱ्या आईसमान व्यक्तीरेखा आहेत. असे गौरव उद्गार सविता गोरखनाथ एस नॅपकिन संस्थापिका यांनी काढले. त्यांनी शाळेला केवळ शिक्षणाचे केंद्र न ठेवता संस्कारांचे मंदिर बनवले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रत्येक विद्यार्थी केवळ यशस्वीच होत नाही, तर एक चांगला माणूस म्हणून समाजात आपली ओळख निर्माण करतो, मी स्वतः एक विद्यार्थिनी असून अनुभव घेते असे कुमारी मानसी पोळ डायरेक्टर एस नॅपकिन बुके हिने मत मांडले.नवदुर्गा पुरस्कार हा फक्त सन्मान नाही, तर स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याला, त्यागाला आणि कठोर परिश्रमाला दिलेला मानाचा मुजरा आहे.



मुख्याध्यापिकांनी स्वतःच्या कष्टातून, संयमातून आणि जिद्दीमुळे समाजात आणि शिक्षणाच्या क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी शिकवलेली एकच गोष्ट नेहमी मनात कोरलेली राहते ज्ञानाच्या वाटेवर चालत राहा, यश तुमच्या पावलांखाली नतमस्तक होईल. असे उद्गार कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पनवेलकर अध्यक्ष युनायटेड कराटे असोसिएशन व व सीईओ एसपी विद्यालय यांनी काढले. पुरस्कारार्थी देशमुख म्हणाल्या, सन्मानामुळे आमचे डोळे आनंदाने ओले झाले आहेत. कारण हा पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाचा आहे, पण त्याचबरोबर तो आमच्या शाळेच्या प्रत्येक शिक्षक, प्रत्येक विद्यार्थ्याचा आणि प्रत्येक पालकाचा अभिमान आहे.

तुमचा हा प्रवास असाच प्रेरणादायी राहो, तुमच्या कार्याने आणखी अनेक जीवनांना दिशा मिळो आणि तुमचं तेज प्रत्येक हृदयात नवसंजीवनी निर्माण करो. असे गौरवोद्गार डॉक्टर गोरखनाथ पोळ मॅनेजर जीवनदीप एड्युमिडीया प्रा लि. व मोटिवेटर एस नॅपकिन बुके यांनी काढले.डॉक्टर गोरखनाथ पोळ यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण उत्कृष्ट निवेदक कविता डॉट कॉम सदस्य नारायण लांडगे पाटील यांना सन्मानित करण्यात आले. कविता डॉट कॉम च्या ७५ वा कार्यक्रम वर्षपूर्ती निमित्त रवींद्र पाटील यांना सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ड नॅपकिन बुकेच्या जडणघडण मध्ये काम करणाऱ्या महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तिसरा वर्धापन दिन सोहळा समाज माध्यमात छाप पाडून गेला. सर्व मुख्याध्यापिकांचा आम्हाला सर्वांचा अभिमान आहे, असे निवेदक रमेश संकपाळ म्हणाले, याप्रसंगी प्रमुख वक्ता रवींद्र पाटील शिवव्याख्याते तसेच कविता डॉट कॉम चे पूर्ण टीम, केतकी प्रकाशन डायरेक्टर जाधव, जी.डी.पी एम टेक्नॉलॉजी दिली. गुप्ता, आरएसपी समाजाचे विलास पाटील, छावा फाउंडेशन अध्यक्ष दामोदर चव्हाण, प्रकाश वाळुंज, उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापकांची यादी खालील प्रमाणे अश्विनी देशमुख, सुनीता कदम, मनीषा जाधव , स्नेहल पाटील, निकिता पाटील, संध्या मोरे, कविता लक्ष्मी, कल्पना जिरे, मोहिनी वाघ, स्मिता पनवेलकर, दिपाली संकपाळ, स्वप्नाली म्हात्रे, सुजाता संदीप पाटील, दक्षता म्हात्रे एस नॅपकिन द्वारे इत्यादी मुख्याध्यापिकांचा सन्मान करण्यात आला.

# थोडक्यात

## बारड मध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानास प्रतिसाद



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील ग्रामीण रुग्णालयात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत एक हजार सातशे रुग्णांची तपासणी करण्यात आली असून महारक्तदान शिबिरात रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान समजून नागरिकांनी रक्तदानाचा हक्क ही बजावला आहे. केंद्र शासन, राज्य शासन तसेच जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे सेवा पंधरवडा अभियानानिमित्त आयोजन करण्यात आले होते . या शिबिराचे उद्घाटन जिल्हा चिकित्सक डॉ.संजय पेरके यांच्या हस्ते करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ.अभिजीत देशमुख, भाजपा जिल्हा महामंत्री बाळासाहेब देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ.नागशेट्टीवर, डॉ.सुकळीकर, डॉ.विभूतवार, डॉ.सुलेमान, डॉ.तिवारी, डॉ.किरण देशमुख बारडकर, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष किशोर देशमुख यांचे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.अभिजीत देशमुख यांनी दमा मुक्त भारत कार्यक्रमाची माहिती दिली. दमा रुग्णांना फूड बास्केट चे वाटप करण्यात आले. सेवा पंधरवाडा २०२५ महाआरोग्य शिबिरात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाअंतर्गत महिला रुग्णांची विशेष तज्ञांकडून तपासणी करण्यात आली . यासोबतच रक्तदाब, मधुमेह, दंतरोग, नेत्ररोग, स्तन व गर्भाशय रोग, मुख कर्करोग यांसह आदी रुग्णांची तज्ञांकडून तपासणी करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या दिव्यांग लाभार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. यासोबतच वंचित दिव्यांग लाभार्थ्यांची तपासणी करून शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला आहे. महारक्तदान शिबिरात पंचक्रोशीतील नागरिकांनी सहभाग नोंदवून रक्तदानाचा हक्क बजावला आहे. अभियान यशस्वीतेसाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ.अभिजीत देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ.नंगशेट्टीवार, डॉ.किरण देशमुख, डॉ.सुकळीकर, डॉ.सुलेमान, डॉ.विभूतवार, डॉ.तिवारी, आरोग्य सेवक बोधगिरे, आटकोरे, कोकाटे, राहुल वैद्य यांच्यासह आरोग्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


## रांजणगावचे सरपंच देशमुख यांची कन्या प्रिती देशमुख हिने जिंकले सुवर्णपदक



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** आखिल भारतीय वायुसैनिक शिबिरात राज्याच्या एन.सी.सी दलाची बहरदार कामगिरी. हर काम देश के नाम या ब्रिदवाक्याला साजेशी कामगिरी करत महाराष्ट्र संचालनाच्या विद्यार्थी सैनिक दलाने (एन.सी.सी) आखिल भारतीय वायुसैनिक शिबिर २०२५ रोजी यश संपादन केले आहे. नागपुर येथे आयोजित अंतरगट स्पर्धेत विजेते पद मिळवत, महाराष्ट्राच्या तुकडीने राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली. देशातील १६ संचालयनातील तुकड्यांशी झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राने नेमबाजी, आरोग्य व स्वच्छता, वैमानिक कौशल्य, हवाई नमुना तयार करणे आणि पथक चाल अशा अनेक स्पर्धामधे सुवर्ण पदक, काश्य पदके पटकावली. नियंत्रण रेषा प्रकारातिल हवाई नमुना स्पर्धेत प्रथमेश जोशी आणि अहिल्यानगर जिल्ह्यातिल पारनेर तालुक्यातील रांजणगाव येथील सरपंच महेश काका देशमुख यांची कन्या प्रितीताई देशमुख ईने सुवर्ण पदक जिंकले. या एकूण कामगिरीमुळे सर्वोत्तम उड्डाण दलाच्या चषक आणी आखिल भारतिय वायुसैनिक शिबिरातील दुसरे सर्वोत्तम हवाई दल हा मान मिळाला. या मागे अधिकारी, प्रशिक्षक, नागपुर मुख्यालय व तिन्ही तुकड्यांचे अधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नाने व संचालक अधिकारी, प्लांईग आफिसर, संचालयाचे गट नायक. कॅप्टन, तांत्रिक प्रशिक्षक, तिन्ही ही दलांचे कमांड अधिकारी, कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्राचा विजयाचा झेंडा राष्ट्रीय आकाशात फडकवल्याने अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव देशाच्या फलकावर लागले. आखिल भारतीय वायु सैनिक शिबिरात राज्याच्या एन.सी.सी दलाच्या बहारदार कामगिरीचे गोड कौतुक जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सुजय विखे पाटील, पारनेर तालुक्याचे आ.काशिनाथ दाते, तरुण वर्गाचे आधास्तंभ असलेले राहुल दादा शिंदे पाटील, दुधसंघाचे चेअरमन दत्ता नाना पवार, रांजणगावचे सरपंच महेश देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे संदीप देशमुख, सरपंच बंटी साबळे, सरपंच शरद सरोदे, चेअरमन अनिल जवक, सरपंच बाबा जवक, योगेश घुले, राजकुमार इकडे (पत्रकार) स्वागत केले.

## कर्मवीरांचे शिक्षण हे सक्षम शिक्षण - न्यायाधीश रामकृष्ण चव्हाण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व प्राथमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तदर्थ जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश रामकृष्ण चव्हाण होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी न्यायाधीश रामकृष्ण चव्हाण, उत्तर विभागीय सल्लागार समिती सदस्य सुनिल मालपाणी, स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष जगदिश जेऊघाले, उपाध्यक्ष कैलास सोनवणे, ज्येष्ठ सदस्य पंढरीनाथ दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी स्वागत केले तर उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे यांनी शाळेचा प्रगती अहवाल सादर केला. मुख्य पाहुणे न्यायाधीश रामकृष्ण चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजनांसाठी सुरू केलेल्या शिक्षणयात्रेचा लाभ घेऊन माझ्यासारखे हजारो विद्यार्थी जीवनात यशस्वी झाले आहेत. रयत शिक्षण संस्थेमार्फत दिले जाणारे शिक्षण हे जागतिक स्पर्धेत टिकून राहणारे सक्षम शिक्षण आहे. यशासाठी शॉर्टकट नसतो. प्रतिकूल परिस्थितीला कारण न बनवता साधन बनवावे. अध्यक्षस्थानी असलेले जगदिश जेऊघाले यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच पी. के.जेऊघाले, व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजाभाऊ गोरे, रंजीत गुंजाळ यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सोमनाथ निकम, मधुकर दरेकर, सतीश शेलार, ज्ञानेश्वर गाडे, किशोर दरेकर, कुमार चव्हाण, ज्युनिअर प्रेस क्लबचे पत्रकार - सुनील शिरसागर सुनील क्षिरसागर, राजेश भडांगे, जनार्दन चव्हाण, मच्छिंद्र साळुंके, अभय पाटील, रोहन सरोदे, दत्तात्रय दरेकर, संदीप धनवटे, मान्यवर, ग्रामस्थ, पालक, शिक्षणप्रेमी तसेच प्राथमिक ते उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चांदे (लाइफ मेंबर, रयत शिक्षण संस्था सातारा) व सावळे यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक सुदामराव माळी यांनी केले.